# विशाखा समिति

## जनजागृती अभियान आणि मार्गदर्शन शिबिर 11 नोव्हेंबर 2021

आजादी अमृत महोत्सव या उपक्रमा अंतर्गत, महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई आणि कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय अंबड तसेच विशाखा समिती अंतर्गत जनजागृती अभियान आणि मार्गदर्शन शिबिर 11 नोव्हेंबर 2021 रोजी सकाळी 11.00 वाजता संपन्न झाले.

या कार्यक्रमासाठी जिल्हा विधी सेवा प्रतिष्ठान ,तालुका विधी सेवा समिती, जिल्हा आणि अंबड न्यायालय यांच्यामार्फत प्रमुख मार्गदर्शिका म्हणून न्यायाधीश श्रीमती चौधरी या लाभल्या. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉक्टर शिव शंकर घुमरे हे होते. तसेच एडवोकेट श्रीमती आशा गाडेकर मॅडम यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापक डॉक्टर विनोद जाधव यांनी केले.

या कार्यक्रमाअंतर्गत न्यायाधीश श्रीमती चौधरी मॅडम यांनी स्त्रियांसाठी कायद्यांमध्ये तरतूद असलेले कलम आणि नियमांची माहिती दिली, तसेच महाविद्यालयीन मुलींच्या अॅसिड हल्ला आणि छेडछाड कायद्याअंतर्गत कलम ,नियमांची ,उपाययोजनांची माहिती देण्यात आली. यानंतर श्रीमती आशा गाडेकर मॅडम यांनी महाविद्यालयीन तरुणींवर होणारे ऍसिड हल्ले तसेच छेडछाडीच्या घटना यासाठी असलेल्या कायद्याच्या तरतुदी आणि उपाययोजना यावर सविस्तर माहिती दिली जेणेकरून महाविद्यालयीन तरुण मुलींमध्ये जनजागृती होऊन अशा प्रसंगाला तोंड देण्याचे धैर्य त्यांच्यामध्ये यावे.

याप्रसंगी एडवोकेट देशमुख सर, एडवोकेट गीतांजली मॅडम यांनीही मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य घुमरे म्हणाले की, आजच्या काळात महिलांनी अशा घटनांकडे बघताना घाबरून जाऊ नये , तसेच कायद्या मधले असलेल्या तरतुदींचा आणि उपाययोजनांचा उपयोग योग्यवेळी आणि निर्भीडपणे करणे, कुठलाही अन्याय सहन न करणे ही आजच्या काळाची गरज आहे. स्त्री सक्षमीकरणासाठी अशा प्रकारच्या कार्यक्रमांमधून जनजागृती करणे, त्यांना मार्गदर्शन करणे ही आजच्या काळाची गरज आहे.

या कार्यक्रमासाठी विशाखा समितीच्या प्रमुख प्रा. जानकी कुर्तडीकर, प्रा. मनीषा गायकवाड, प्रा. शकुंतला मस्के तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनींची उपस्थिती लक्षणीय होती.

याप्रसंगी सदरील संस्थेतर्फे महिला जनजागृती साठी परिपत्रके देखील वाटण्यात आली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. जानकी कुर्तडीकर.यांनी केले


महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई
जनजागृती अभियान/मार्गदर्शन शिबीर
कालावधी २ ऑक्टोबर २०२१ ते १४ नोव्हेंबर २०२१



